**प्रेस नोट** दि. २६/०८/२०१९

## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे कडुन बाळ गोपाळांना त्याचे सुरक्षितेबाबत शुभेच्छा पत्रांचे वाटप करण्यात आलेबाबत..

पुणे शहरात साजरा होणाऱ्या दहिहंडी उत्सव यावर्षी दि. २४/०८/२०१९ रोजी साजरा झाला. नमुद दहीहंडी उत्सवामध्ये पुणे शहर व आपपासच्या गावांमधील बाल गोपालांचा समावेश असणाऱ्या गोविंदा पथकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. अशा वेळी विविध भागांमधुन आलेली गोविंदा पथके उंच थरावरील दहिहंडी फोडण्याच्या प्रयत्नांत असताना थरामधुन घरुन व अन्य कारणांने पडुन जखमी होतात. यामुळे सदरच्या घटना टाळण्यासाठी तसेच जखमी होणाऱ्या गोविंदांच्या पुढील भवितव्याचा विचार करुन त्यांच्यामध्ये सुरक्षितेची भावना निर्माण करण्याच्या अनुषंगाने प्रबोधन करण्यासाठी मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे सकल्पनेतुन मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ श्री. शिरिष सरदेशपांडे व मा. सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग श्री. मोलोजीराव पाटील यांचे मार्गदर्शनाखाली भारत विद्यापीठ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. विष्णु शं. पवार यांनी आपले अधिपत्याखालील पोहवा ४०५७ शरद डाळवाले, पोहवा २५७२ संजय जाधव, पोना १४७२ संदीप पवार, पोना १९८५ धनाजी वणवे, पोशि ८९१३ असिफ सय्यय, पोशि ८७०१ सुमित मोघे इत्यादी पोलीस कर्मचारी यांचे समवेत बाल गोपाळांच्या सुरक्षितेसाठी उपाय व आणीबाणीच्या प्रसंगी पोलीस ठाणे व पोलीस नियंत्रण कक्षाचा संपर्क क्रमांक असणारे शुभेच्छा पत्रे तयार करुन सार्वजनिक दहिहंडी उत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या बाल गोपाळांना पुष्पगुच्छ व शुभेच्छापत्र देऊन त्यातुन प्रत्येक बाल गोपाळांनो घरी लवकर व सुरक्षित या, यशोदामैय्या तुमची वाट पहात आहे असा संदेश देऊन सामाजिक बांधलिकी जपुन जन माणसात व समाजात पोलीस दलाची प्रतिमा उंचविण्याचा प्रयत्न केलो.

